---

# Unit 3
# Metaphysics
# घटक ३
# सत्तामीमांसा

---

**अभ्यासक्रम**
**सत्तेचे स्वरूप**




अ) भारतीय : चार्वाक, बौद्ध, वेदान्त.
ब) पाश्चात्य : जडवाद, चिद्वाद



**प्रस्तावना -**

''तत्त्वज्ञान''आणि 'तत्त्वज्ञान' या संज्ञेतील 'ज्ञान' या संकल्पनेचा आणि 'ज्ञानमीमांसा' या तत्त्वज्ञानाच्या शाखेचा परिचय आपण करुन घेतला आहे. या प्रकरणात आपण 'सत्तामीमांसा [1]' या शाखेचा परिचय करुन घेणार आहेत.

ज्ञानमीमांसेनुसार ज्ञानप्रक्रियेत ज्ञाता,ज्ञान व ज्ञेयवस्तू असे तीन घटक असतात.

1. ज्ञेयवस्तू म्हणजे ज्याचे ज्ञान होते ती वस्तू - (Object of Knowledge).
2. ज्ञाता म्हणजे ज्यास ज्ञान होते ती व्यक्ती - (Knower)
3. ज्ञान म्हणजे ज्ञाता व ज्ञेयवस्तू यांच्यातील आंतरसंबंध (Knowledge).

ज्ञेयवस्तू अस्तित्वात आहे का? आता, ज्ञेयवस्तू अस्तित्वात नसेल तर तिचे ज्ञान कसे प्राप्त होईल? ज्ञानासाठी तिचे 'असणे' हवेच. साधारणपणे आपण असे समजतो की *अस्तित्वात असणे* म्हणजे विशिष्ट स्थलकालात असणे. कुठेतरी कोणत्यातरी क्षणापर्यंत मूर्तरुपात असणे.पण ज्यांना असे स्थलकाल नाही, असे काही अस्तित्वात असू शकते काय ? या अस्तित्वाचे स्वरुप काय ? ते कसे कळते ? त्याचे ज्ञान कसे होते ? असे प्रश्न निर्माण होतात. उदाहरणार्थ स्थल अस्तित्वात असते, पण 'काल' (Time) अस्तित्वात असतो काय ?

''किती वाजले?'' याचे उत्तर घड्याळ बघून देता येते पण किती कसे वाजतात?,याचे खरे उत्तर खगोलशास्त्रज्ञच देऊ शकतो. किती वाजले ? याचे उत्तर देणे, म्हणजे पृथ्वीचे सूर्याभोवती फिरण्याचे अवकाशातील स्थान स्पष्ट करणे. या अर्थाने आधीचे स्थान अथवा नंतरचे स्थान सांगणे याचाच अर्थ भूतकाळ व भविष्यकाल सांगणे होय. पण तत्त्वज्ञ 'काल म्हणजे काय ? असा प्रश्न विचारतो आणि 'काल' ही संकल्पनाच स्पष्ट करतो. आता 'काल' अस्तित्वात असतो का? कालाला सत्ता असते, म्हणजे नेमके काय असते ? हा सत्ताविषयक प्रश्न आहे.

थोडक्यात 'अस्तित्व'(Existence) या शब्दाचा अर्थ काय ? एखादे काहीतरी अस्तित्वात असणे याचा अर्थ नेमका काय होतो ? अशा सर्व समस्याचा अभ्यास अस्तित्त्वशास्त्रात किंवा सत्तामीमांसेत होतो.

**Existence[2] आणि सत् :** अस्तित्व' या शब्दाला संस्कृतमध्ये *सत्* म्हंटले जाते. *सत्* पासून सत्य, सत्ता हे शब्द बनतात. सत्य म्हणजे अशी गोष्ट की जी 'नाही', असे म्हणता येत नाही. ती 'आहेच' असे म्हणावे लागते. म्हणून अस्तित्वास *सत्य / सत्ता* असे

---

[1]सत्ताशास्त्र (Metaphysics) ही तत्त्वज्ञानाची शाखा सत्ताविषयक समस्यांचा अभ्यास करते.इंग्लीशमधील Metaphysics ही संज्ञा अॅड्रोनिकस (ऑफ ऱ्होड्स, इ.स.पू.६०, Andronicus of Rhodes) याने प्रथम प्रचारात आणली. अॅड्रोनिकस हा अॅरिस्टॉटलने स्थापन केलेल्या 'येरझाऱ्या पंथाचा (The Peripatetic school) अकरावा प्रमुख' आणि संपादक - ग्रंथपाल होता. त्याने अॅरिस्टॉटलच्या ग्रंथांची रचना करताना Physics च्या पुस्तकांच्या नंतर ईश्वर, आत्मा, मन, ज्ञान इत्यादीविषयक ग्रंथ क्रमाने लावले. किंवा त्यामुळे या ग्रंथांना *After the Physics* म्हणून Metaphysics असे नाव मिळाले. (*ta meta ta physika biblia*) किंवा "the books that come after the [books on] physics".Greek भाषेत Meta म्हणजे नंतर ("beyond", "upon" or "after"), आणि *physiká* म्हणजे Physics.खुद्द अॅरिस्टॉटलने मात्र आपल्या विचारांना "first philosophy." हे नाव दिले होते.

[2] (1) "Existence" हा शब्द लॅटीन भाषेतील *existere* या शब्दापासून बनतो. त्याचा अर्थ ''प्रकट होणे, वास्तवात येणे, अस्तित्वात येणे. खरे तर शब्दशः अर्थ आहे "to stand out"- 'कशाच्या तरी' - बाहेर येणे''. लॅटीनमधील *stare* चा अर्थ प्रकट होणे किंवा उघड होणे. '*stare* ' ला *ex*-लॅटीन प्रत्यय लागून *existere* हा शब्द बनतो. "Existence" हे त्याचे इंग्लीश रुप आहे. http://en.wikipedia.org/wiki/Existence

(2) अन्य माहितीनुसार *existentia/exsistentia*, from *existentem/exsistentem* (nominative *existens/exsistens*) ही या शब्दाची तिर रुपे आहेत. त्यानुसार ***ex***-+*sistere* असे मिळून "cause to stand" असा अर्थ होतो. http://etymonline.com/?term=existence

Prof. Shriniwas Hemade, shriniwas.sh@gmail.com, 915 865 80 66 Sangmner College, Sangamner 422605

म्हंटले जाते.त्यामुळे अस्तित्वशास्त्रास 'सत्तामीमांसा किंवा सत्ताशास्त्र' असाही शब्द वापरला जातो. यात मुख्यतः चार ज्ञेयवस्तूंच्या स्वरुपाचा अभ्यास होतो : -

1. दृश्य जगत
2. माणूस (+एकूण सजीव सृष्टी )
3. स्व (आत्म Self)
4. अनुभवातीत तत्त्व : चित्तत्त्व किंवा ईश्वर किंवा जडतत्त्व

सोप्या भाषेत जीव, जगत, जगदीश, हे सत्तामीमांसेचे अभ्यास विषय होय. जग म्हणजे दृश्य जग, निसर्ग,तारे-तारका, चंद्र, सूर्य ,आकाश इत्यादी.( तसेच विज्ञान-तंत्रज्ञानामुळे ज्ञात होणारे अज्ञात जग ).सजीवसृष्टी म्हणजे जगताचा भाग असणारे मानवी समाज, पशुपक्षी. अनुभवातीत तत्त्व म्हणजे परतत्त्व. म्हणजेच या जगाचे अधिष्ठान असलेले तत्त्व. ते कुणाच्या मते ब्रह्म, कुणाच्या मते ईश्वर ,कुणाच्या मते जडतत्त्व, तर कोणाच्या मते जड व चेतन यांचे द्वैत होय. थोडक्यात, -

1. हे जग काय आहे ?
2. ते कुणी निर्माण केले आहे ?
3. की ते मुळातच अस्तित्वात आहे ? आणि ' मूळातच असेल तर मुळात असण्याचा नेमका अर्थ काय ?
4. की जग खरे तर अस्तित्वातच नाही पण नुसते भासते आहे ?
5. जगत कुणी निर्माण केले केले असेल तर ती निर्माण करणारी निर्माती शक्ती म्हणजेच ईश्वर का ? तशी काही शक्ती असेलच तर ही शक्ती स्त्री आहे की पुरुष ? की ती शक्ति निर्लिंग आहे ?

थोडक्यात, दृश्य विश्व, विश्वार्तंगत पदार्थ व विश्वातीत तत्त्वे (परतत्त्वे) यांच्या सत्तेचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची शाखा म्हणजे **सत्तामीमांसा** होय.

## अध्यात्मशास्त्र Metaphysics

Metaphysics चे भाषांतर अध्यात्मशास्त्र असेही करण्यात येते.आत्म् म्हणजे 'आत्म' = स्वतः आणि अधि = पलिकडे जाणे. स्वतःच्या पलिकडे जावून व्यापक गोष्टीचा विचार करणे म्हणजे *अध्यात्म* होय.ज्यांचा असा विचार केला जावू शकतो त्यात समाज,समाजाची सुखदु;खे, आत्मा, धर्म, ईश्वर,अंतिम सत्य अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो.

माणसाचे सुरक्षित, संवर्धित अस्तित्व हाच खरा अध्यात्मशास्त्राचा मूळ चिंतनविषय आहे.त्यामुळे साहजिकच आस्तिकाचे (ईश्वरवाद्याचे अथवा धर्मवाद्याचे)जसे अध्यात्मचिंतन असते तसे नास्तिकाचे (निरीश्वरवाद्याचे) सुध्दा अध्यात्मशास्त्र असू शकते.त्याचबरोबर धर्मच न मानणारे निधर्मी, धर्मनिरपेक्ष किंवा ईहवाद्याचेही अध्यात्मशास्त्र असू शकते.

जनसामान्यामध्ये अध्यात्मशास्त्र म्हणून जे प्रचलित आहे ते खरे तर धर्मशास्त्र असते. ते काटेकोर अर्थाने सद्वस्तूशास्त्र किंवा तत्त्वज्ञानात्मक सत्तामीमांसा नसते.अध्यात्म, अध्यात्मिक म्हणून ज्याची चर्चा केली जाते ते त्या त्या धर्माचा प्रचार आणि प्रसार करणारे धर्मशास्त्र (Theology) असते.आणि धर्मशास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान नसते.कारण धर्मशास्त्रात चिकीत्सा नसते.उलट अध्यात्मशास्त्र हा तत्त्वज्ञानाचा भाग असल्याने त्यात चिकित्सा असते. आवश्यकतेनुसार अध्यात्मशास्त्राच्या तपशीलात बदल केला जावू शकतो ,ते नाकारलेही जावू शकते.

संक्षेपात : (1)अनुभवक्षम जग (जगातील माणसे)
(2)अनुभवापलिकडचे अंतिम तत्व
(3) अमूर्त संकल्पनांचे जग

-अशा तीनही प्रकारच्या अस्तिवाचा अभ्यास करणारी तत्वज्ञानाची शाखा म्हणजे 'सत्तामीमांसा' होय. या संकल्पना, अंतिम तत्व, त्यांचे जग खरेच आहेत का? त्यांचे अस्तित्व स्विकारल्यास, किंवा नाकारल्यास काय घडते? अशा विविध प्रश्नांचा अभ्यास सत्तामीमांसा करते.

ही सत्ता कशी आहे ? तिचे स्वरुप काय आहे? तिला कसे जाणता येईल? माणसाचे त्या सत्तेतील स्थान नेमके कोणते ? मानव हे सत्तेचे रुप आहे की आविष्कार आहे? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. म्हणजे दृश्य जग आणि त्या जगाशी असेलेले माणसाचे नाते कोणते? त्याचप्रमाणे माणसाचे परस्परांशी नाते कोणते? याचा विचार आता करता येईल, या संबंधात आधी आपण भारतीय विचारवंताचे मत पाहू.

## सत्तेचे / वास्तवाचे स्वरुप

Prof. Shriniwas Hemade, shriniwas.sh@gmail.com, 915 865 80 66 Sangmner College, Sangamner 422605

## अ) भारतीय मते :

### 1) चार्वाक दर्शन

चार्वाक नावाचा विचारवंत प्राचीन काळात होवून गेला असावा. या चार्वाकाचा जन्म इ.स.पू.2440 झाला, असा समज आहे. हा एक विद्‌वान ,पक्व बुद्‌धिचा ब्राह्मण होता. चार्वाकाने मांडलेले विचार लोकांना मान्य झाले. त्यामुळे त्याच्या तत्त्वज्ञानास 'लोकायत' असेही नाव आहे.



काहीजणांच्या मते *बृहस्पती* नामक देवगुरुने ही विचारसरणी मांडली.त्यामुळे या तत्त्वज्ञानास **'बृहस्पती दर्शन'** अथवा **बार्हसपत्यदर्शन** असेही नाव आहे. बृहस्पतीने हे तत्त्वज्ञान सूत्र म्हणजे श्लोकरुपात मांडले.त्यांना **'बार्हस्पत्यसूत्रे'** असे नाव आहे.चार्वाकाच्या मते खरे अस्तित्व केवळ दोन प्रकारचे आहे. पहिले म्हणजे हे दृश्य जग आणि माणूस किंवा मानवी समाज. त्यांचे स्वरूप अनुक्रमे पुढीलप्रमाणे :

**चर्तुभूतात्मक जग -सत्तेचे स्वरुप**

चार्वाकांच्या मते प्रत्यक्ष अनुभव हेच केवळ ज्ञानाचे साधन आहे.ज्यांचा आपल्या ज्ञानेद्रियांना प्रत्यक्ष अनुभव येवू शकतो,तेच सत्य असून इतर गोष्टीवर विश्वास ठेवता येत नाही.अनुभवालाच ते **'प्रत्यक्ष'** (Perception) असे म्हणतात.

प्रत्यक्षाने आपणास कशाचा अनुभव येतो ? चार्वाकांचा मते प्रत्यक्षाने आपणास केवळ भौतिक जगाचाच अनुभव येतो.जगाचे चार घटक आहेत. पृथ्वी,अग्नी,वायू आणि जल.यांना **महाभूते** म्हणतात.केवळ हीच चार महाभूते अस्तित्वात असतात. ही महाभूते भौतिक आहेत.ती चार्वाक स्वीकारतात.त्यामुळे चार्वाकांना भौतिकवादी तत्त्वज्ञ म्हंटले जाते. आकाश नावाचे पाचवे महाभूत इतर वैदिक दर्शने स्वीकारतात.मात्र चार्वाकांच्या मते आकाशाचा अनुभव येत नाही,त्यामुळे आकाश अस्तित्वात नाही.

प्रत्यक्ष हेच ज्ञानाचे साधन असल्याने ज्याचे प्रत्यक्ष होवू शकत नाही ते अस्तित्वात नाही,असे चार्वाक समजतात. त्यानुसार **चार्वाक तत्त्वज्ञ अंतिम सत्य,आत्मा,ईश्वर,ब्रह्म अशा तत्त्वांवर विश्वास ठेवित नाहीत.ते भौतिकवादी आहेत.**

**देहात्मवाद**

''मी उंच आहे'', ''मी हुशार आहे'' इत्यादी विधानांमधील 'मी' म्हणजे शरीर असते, आत्मा नाही. आपल्याला ज्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो तो शरीराचा.त्यामुळे **मी म्हणजे शरीर** होय.आत्मा मानावयाचाच असला तर देहालाच आत्मा मानावे.''देह हाच आत्मा'' असे चार्वाक म्हणतात. देह चार महाभूतांपासूनच बनतो.ते एकत्र आले की शरीरात चेतना निर्माण होते.जसे कात,चुना,तंबाखू पानात घालून खाल्ल्यानंतर मुळात अस्तित्वात नसलेला लाल रंग तयार होतो,तसे चार महाभूते एकत्र आली की शरीरात चैतन्य निर्माण होते.या चैतन्यालाच काही लोक चुकून 'आत्मा' म्हणतात,तथापि आपणास आत्म्याचा कोणताही अनुभव येत नाही.त्यामुळे आत्मा नावाचे द्रव्य नसते.माणूस मरतो याचा अर्थ ही चार महाभूते वेगवेगळी होतात,एवढेच.म्हणूनच पुर्नजन्म नसतो. एकदा देहाची राख झाली की पुन्हा जन्म मिळत नसतो.या सिध्दान्तास **देहात्मवाद** म्हणतात.

आत्म्याप्रमाणेच ईश्वरचाही आपणांस कधीही अनुभव येत नाही.हे जग चार माहभूते एकत्र येवून निर्माण झालेले आहे.ते कुणी निर्माण केलेले नाही,त्यास कोणीही निर्माता नाही. त्यामुळेच कोणतेही धार्मिक ग्रंथ स्वीकारणे चूक आणि दिशाभूल करणारे आहे.कसलेही कर्मकांड,पूर्जाअर्चा,जपजाप्य करणे हा मुर्खपणा आहे.

**सुखवाद**

एकदा देहाची राख झाली की पुन्हा जन्म मिळत नसल्याने माणसाने या मिळालेला जन्म केवळ सुख मिळविण्यातच घालवावा.माणसाचे सर्वोच्च ध्येय केवळ सुख हेच असले पाहिजे.प्रत्यक्षानुभवाने जे मिळते ते सुखच असते.मानवी जीवन सुखी करण्यासाठी मानवाने जीवनशिक्षण, शेती, व्यवसाय, उद्‌योग, साहित्य, संगीत, कला, नाट्‌य, चिंतन यांची निर्मिती करावी. त्यांचा उपभोग घ्यावा आणि सुखाने जगावे,असा **सुखवाद** चार्वाक मांडतात.

चार्वाकांनी अशा प्रकारे त्यांचा भौतिकवाद (Materialism) मांडला.या भूमिकेतूनच ते वैदिकांचे - म्हणजे हिंदुधर्माचा आधार असलेले वेदग्रंथ,धर्मग्रंथ नाकारतात.म्हणून त्यांना ''नास्तिक/अवैदिक'' म्हंटले आहे.चार्वाकांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी जैन आणि बौध्द दर्शनास सुध्दा विरोध केला.

### 2.बौद्ध दर्शन

महात्मा गौतम बुद्धाने स्थापलेला धर्म म्हणजे बुद्धधर्म आणि या धर्माचे तत्त्वज्ञान ते बौद्ध दर्शन होय.

गौतम बुद्धाचा जन्म इ.स.पू.563 ला हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या कपिलवस्तु नगरीत झाला. बुध्दाला **भगवान बुद्ध** म्हणतात. त्याचे एक महत्वाचे नाव **सिध्दार्थ** .संपूर्ण आशिया खंडात आणि जगातच बैद्ध धर्म महत्वाची भूमिका बजावित आहे .तो राजपुत्र होता.तरीही जीवनातील सत्ये समजल्याने तो संन्यासी झाला.





बुद्धाने स्वतः कोणतेही ग्रंथ लिहीले नाहीत.पण त्याने केलेल्या उपदेशावर आधारित काही ग्रंथ त्याच्या मृत्यूनंतर लिहीले गेले.ते तीन पेटारे भरुन होते.पेटी/पेटारा म्हणजे पिटक.म्हणून त्यांना **'त्रिपिटक'** म्हणतात. सुत्तपिटक, अभिधम्मपिटक आणि विनयपिटक अशी त्यांची नावे आहेत.ते पाली भाषेत लिहीले गेले.

मानवी जीवनातील जरा (वृध्दत्व), व्याधी (रोग) आणि मृत्यू पाहून दुःख हेच सर्वाचे मूळ कारण असल्याचा साक्षात्कार बुद्धाला झाला. तपश्चर्येनंतर जे ज्ञान बुद्धाला प्राप्त झाले, त्यासंबंधातील पहिले प्रवचन त्याने वाराणसीजवळ सारनाथ येथे पाच तपस्वी साधूंसमोर दिले .या प्रवचनास **' धर्मचक्रप्रवर्तन** '( धम्मचक्क पवत्तन ) असे म्हणतात. भारतच्या राष्ट्रध्वजावर असलेले **अशोकचक्र** धर्मचक्राचेच प्रतीक आहे.या प्रवचनात त्याने ज्या सत्यांचा उपदेश केला ती चार सत्ये आहेत. त्यांना **आर्यसत्ये** म्हणतात. दुःख,दुःखाचे कारण, दुःखाचा निरोध, दुःखाचा निरोधाचा मार्ग अशी ती चार आर्यसत्ये आहेत. दुःखाचा निरोधाचा मार्ग आठ मार्गांचा आहे ,त्यामुळे त्यास **अष्टांगमार्ग** म्हणतात. असा मार्ग प्रथमच कुणीतरी सांगितला म्हणून त्यास '**आर्य अष्टांगमार्ग** म्हणतात.

## जगाविषयीची मतेः

### अनित्यततावाद आणि अनात्मवाद

(1) अनित्यतावाद : क्षणभंगवाद

अनित्य असँ म्हणजे सतत बदलणे, नित्य नसणे. दृश्य जग, माणूस व माणसाचेही विश्व सतत परिवर्तनशील आहे, हा बुद्धाचा अनित्यततावाद होय. हे सिद्ध करण्यासाठी पुढील युक्तिवाद बुद्धाने केले.

(1) अर्थक्रियाकारित्व :

जे अस्तित्वात आहे (म्हणजे जे सत् आहे) ते क्षणिकच असते. अस्तित्व म्हणजे काय ? या प्रश्नास 'अर्थक्रियाकारित्व' असे बौध्दांचे उत्तर आहे. अर्थक्रियाकारित्व म्हणजे काहीतरी घडवून आणण्याचे सामर्थ्य. जर क्रिया करण्याचे सामर्थ्य नसेल तर अस्तित्वही नसतेच. एखादी गोष्ट 'आहे' याचा अर्थ काहीतरी घडवून आणण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे असा होतो.

असे काही घडून येणे म्हणजे पहिल्या गोष्टीने नाहीसे होणे आलेच.बीजातून अंकुर फुटतो पण त्या वेळी बीज नाहीसे होते. याचाच अर्थ असा की, सर्व गुणधर्म हे क्षणिक आहेत.पण समजा, कोणी अशी शंका काढील की कणगीत ठेवलेल्या बियांच्या ठिकाणी बीज फुटणे हे कार्य घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे. पण ते न घडता कितीतरी क्षण ते बी कणगीत तसेच राहाते.येथे कार्य घडत नाही पण कारण रूपी बी अस्तित्वात आहेच ना ? मग ते नाही, असे म्हणता येणार नाही. त्याच्या ठिकाणी कार्य घडवून आणण्याचे सामर्थ्यही आहे.पण त्यास क्षणिक म्हणता येणार नाही.

या शंकेवर बौध्दाचे उत्तर असे : जर कारणात सामर्थ्य असेल तर कार्य तत्काल घडून आलेच पाहिजे. अमुक एक कालपर्यंत ते सामर्थ्य वाट पहात राहते असे मानता येणार नाही. कारण अमुक एक काल लोटला, हे त्या सामर्थ्याला कळणार तरी कसे ? ज्यात काहीच घडत नाही असा अमुक एवढा अथवा तेवढा काल निघून गेला याचा अर्थ काय ? तो काल एवढा - तेवढा असे म्हणताच येणार नाही.तसे म्हणण्यासाठी काही तरी घडावे लागेल.म्हणून, पदार्थ या क्षणापासून त्या क्षणापर्यंत अस्तित्वात आहे याचा अर्थ मध्यंतरी काही तरी घडले आहे असाच होईल आणि जेव्हा काही घडते तेव्हा पूर्वक्षणीचा पदार्थ नष्ट होऊन त्याच ठिकाणी दुसरा उत्पन्न झाला असेच म्हटले पाहिजे.हे विधान कुठल्याही क्षणासंबंधी करता येते, अमुकच एका असे नव्हे.

थोडक्यात म्हणजे जे *'सत्'* आहे त्याच्या ठिकाणी अर्थक्रियाकारित्व असते आणि म्हणून ते क्षणिक आहे. अर्थक्रियाकारित्वाची क्षणिकता असा थोडक्यात हा युक्तिवाद आहे.

**(2) क्षणभंगवाद : जगासंबंधी**

बौध्दांच्या मते अर्थक्रियाकारिकत्व किंवा क्षणभंगवाद जगाला आणि 'मी' पणालाही लावात येईल.जगाकडे पाहाता आपल्या आजुबाजूच्या सर्वच गोष्टी नाशवंत आहेत, घर, पुस्तक, खुर्चीप्रमाणेच समोरचा डोंगर जरी घेतला तरी काही लाख वर्षांनी तो तेथे असणार नाही.नष्ट होणारी कोणतीही गोष्ट आकस्मात एका क्षणी नष्ट होते, असे मानता येणार नाही.आपणांस दृग्गोचर न होणारे फरक दर क्षणाला घडत असणार.थांबून थांबून ते फरक कसे पडावेत याचा नियम नसतो. फरक पडणे म्हणजे पहिली गोष्ट नष्ट झाली व दुसरी उत्पन्न झाली असेच मानावे लागते. याचाच अर्थ असा की, कुठलाही पदार्थ एक क्षणपर्यंत टिकून राहतो व दुस-या क्षणी त्यात फरक पडतो व तो नष्ट होतो.

असे आहे तर तोच हा मघाचा घट अशी ओळख आपणांस कशामुळे पटते? बौध्दांचे उत्तर असे की, प्रत्येकक्षणाला घट उत्पन्न होतो आणि त्याच क्षणाला नष्टही होतो. असे सतत व वेगात घडत असते.या प्रक्रियेत नष्ट होणार व उत्पन्न होणारा घट यात फरक नाही असे जाणवत असते.कारण दर क्षणाला नष्ट होऊन नवीन उत्पन्न होणारे घट एकमेकांशी अतिशय **सदृश** असतात.त्या सादृश्याने फसून जावून आपण त्यांच्यात तादात्म्याची म्हणजे ते एकच असल्याची कल्पना करतो.



प्रत्येकक्षणाला उत्पन्न होणे आणि त्याच क्षणाला नष्टही होणे, असे सतत घडणे म्हणजे त्यांचा संतत प्रवाह तयार होणे, असते.घट जाणला जातो म्हणजे वास्तवात घटांची एक मालिका, संतान अथवा संतति असते, आणि त्या घटसंतानालाच आपण अज्ञानाने एक घट म्हणत असतो.हा **संतानवाद** होय.

बौध्दमतानुसार कालाच्या संदर्भात विचार करता संघातांमध्ये अखंड परिवर्तन होत असते आणि कोणत्याही दोन क्षणी संघात एकरूप असत नाही. आत्मा आणि भौतिकविश्व हे दोन संतानप्रवाह आहेत. बुध्दाच्या मते सत्ता (Being) हे सत्य नाही, तसे सत्ताशून्यत्व (Non- being)हे ही सत्य नाही, तर केवळ 'भवन' (Becoming)हेच सत्य आहे.सतत परिवर्तन होत असणे, संतानप्रवाह गतिमान असणे, हेच सत्तेचे अंतिम स्वरूप आहे.सतत उत्पत्ति होत असूनही कोणतीह नवीन वस्तु अस्तित्वात येत नसते. जग ही सतत अस्तित्वात येण्याची आणि नाश पावण्याची जगतप्रक्रिया आहे.ही प्रक्रिया हीच वस्तु आहे.[3]

**(3) क्षणभंगवाद : 'आत्म 'संबंधी**

हा क्षणभंगवाद केवळ बाह्य जड पदार्थांना म्हणजे जगाला किंवा रुपस्कंधांनाच नाव लागू आहे असे नाही, तर आंतरिक पदार्थांना म्हणजे आत्मा नावाचा तत्त्वालाही लागू आहे.वेदांती इत्यादि आत्मावादी ज्याला स्थिर आत्मा म्हणतात तसा आत्मा नसतो. या ठिकाणी बौध्द 'चित्तचैत्यस्कंध ' नावाची संकल्पना मांडतात. जसे गेल्या क्षणीचा घट आणि या क्षणीचा घट हे जसे एकमेकांहून निराळे, तसेच 'गेल्या क्षणीचा' मी आणि 'या क्षणीचा' मी हेही एकमेकांपासून वेगळेच असतात.

पण बाह्य पदार्थासंबंधी एक वेळ हे मानले तर ठिक पण स्वतःसंबंधी, 'मी' संबंधी क्षणभगवाद कसा स्वीकारता येईल? कालचा मी आणि आज झोपून उठलेला मी हे जर निराळे असू, तर काल रात्री मी अंथरुणावर पडलो हे स्मरण कसे शक्य होते ? यावर बौध्द अनात्मवाद मांडतात. त्याचे स्वरुप असे :

**अनात्मवाद**

बौध्दांच्या मते जग सतत परिवर्तनशील आहे, त्यामुळे जगात स्थिर असे काहीही तत्त्व नाही. हाच नियम आत्मा नामक द्रव्यालाही लागू आहे. आपल्या अनुभवास येणा-या परिवर्तनशील गुणधर्मांना आश्रय देणारा आत्मा नामक काहीही नित्य पदार्थ नसतो, हा त्यांचा अनात्मवाद होय. त्यांच्या मते प्रत्येक जीवाला स्कंध असतो. स्कंध म्हणजे संघात होय.

'जीव', 'सत्व', 'पुरुष' किंवा 'व्यक्ति' या संकल्पनेऐवजी बौध्द दर्शनात 'पुद्‌गल' [4] ही संकल्पना आहे. **पुद्‌गल म्हणजे निरनिराळया स्कंधाचा एक संघात. स्कंध म्हणजे अनेक धर्माचा एक समुदाय.** पुद्‌गल अथवा जीव हा नाम आणि रुप या स्कंधांचा बनलेला आहे. 'नाम' म्हणजे सा-या मनःप्रवृत्ती.रुप म्हणजे जड पदार्थ.

पुद्‌गल अथवा व्यक्ती ही रुप, वेदना, संज्ञा संस्कार व विज्ञान अशा पाच स्कंधाची मिळून झालेली असते. रुप म्हणजे व्यक्तित्वाचा भौतिक अंश, वेदना म्हणजे सुखाची अथवा दुःखाची भावना (feeling), संज्ञा म्हणजे वस्तूची जाणीव (perception), संस्कार म्हणजे वासनात्मक प्रवृत्ती (conative disposition)व विज्ञान म्हणजे निश्चित आकार नसलेली जाणीव (sensation) असे अर्थ केलेले आहेत.बौध्द मताप्रमाणे मानवी व्यक्ती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून या धर्माच्या समुदायांचे म्हणजे या पंचस्कंधाचे एकत्र राहणे एवढेच आहे.

उदाहरणार्थ एखादे फूल घेतल्यास जसे गंध-रंग-स्पर्श इत्यादी धर्म फूल या पदार्थाच्या ठिकाणी राहतात. या सर्व धर्माहून फूल हे वेगळेच आहे. फूल हे द्रव्य एकच असून हे धर्म थोडेबहुत बदलेले, तरा फूल स्थिरच राहते, असे समजले जाते.फूल

---

[3] एम. हिरियण्णा - अनुवाद : भा.ग.केतकर *'भारतीय तत्त्वज्ञानाची रूपरेषा '*पान 138

[4] जैन दर्शनात पुद्‌गल याचा अर्थ याहून फारच निराळा आहे.तेथे पुद्‌गल म्हणजे अणू.

Prof. Shriniwas Hemade, shriniwas.sh@gmail.com, 9156858066, http://shriniwashemade.yolasite.com/

नावाचे द्रव्य स्थिर असून धर्म बदलतात, असे वाटते. पण बौध्दांना हा द्रव्यपदार्थ नाकारावयाचा आहे. गंध-रंग-स्पर्श इत्यादी धर्माहून वेगळा असा फूल नावाचा काही द्रव्य पदार्थ नाही, कारण त्याचा आपणास अनुभव नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

उलट फूल म्हणजे या सर्व धर्माचा संघात म्हणजेच फूल, असा त्यांचा सिध्दान्त आहे. हा नियम ते आत्मा संकल्पनेला लागू करून आत्मा नाकारतात. त्यांच्या मते प्रतिक्षणी निर्माण होणा-या राग, द्वेष, इच्छा, सुख, दुःख, संज्ञा इत्यादी चित्तधर्मांना आधारभूत अशा एक स्थिर पदार्थाची आपण कल्पना करतो व त्यास आत्मा म्हणतो. पण वास्तवात या निरनिराळया चित्तधर्माच्या समुदायांचा संघ असतो.

या संघाताहून वेगवेगळया स्थिर आत्म्याची कल्पना आपण करतो तीच आपल्या तापाला कारण होते.आत्मा असा पदार्थ नाहीच.जसे जड वस्तूंच्या धर्मांना काही आश्रय नसतो तसे चेतन पुद्गलांच्या चित्तधर्मांना काही आधारद्रव्य नाही. जे आहेत ते केवळ धर्म आहेत. धर्माचे संघात व त्या संघातांचे संतान हेच विश्वाचे स्वरुप असते. हाच **अनात्मवाद** किंवा **नैरात्म्यवाद** होय.

ग्रीक राजा मिलिंद (मिनॅंडर) व भिक्षु नागसेन यांची गोष्ट प्रसिध्दच आहे.[5] राजा भेटावयास आला असता नागसेनाने अनात्म - सिध्दान्ताचे प्रवचन केले.परंतु राजाची खात्री न झाल्याने नागसेनाने प्रश्न केला, ''महाराज आपण कसे आलात? पायीच आलात की काय ?'' राजा म्हणाला,''नाही, मी रथातून आलो''.नागसेन म्हणाला, ''रथ म्हणजे काय ? चाके म्हणजे रथ की कणा म्हणजे रथ की घोडे म्हणजे रथ ? असल्या निरनिराळया अवयवांहून वेगळा असा रथ नावाचा पदार्थ दाखविता येईल काय ? नाही ! कारण रथ म्हणजे या सर्व अवयवांचा केवळ संघातच होय. हीच गोष्ट ज्यास आपण 'मी' म्हणतो त्याचीही होय.राजा, 'तू', किवा 'मी' धर्माच्या स्कंधाचे संघातच आहोत''.

अगदी तसे आत्म्यासंबंधी आहे, ज्यास आत्मा म्हणतात तो खरा आत्मा नसतो तर विविध स्कंधांचा, धर्मांचा संघात असतो.'रथ' हा शब्द विशिष्टरितीने जोडलेल्या भागांचे किंवा अवयवांचे प्रतीक आहे, तसेच 'आत्मा' हा शब्द काही शारीरिक आणि मानसिक घटकांच्या संघाताचे प्रतीकचिन्ह आहे.आत्मा नसतोच, जे काही चैतन्य आहे ते केवळ चित्तात उमटलेल्या स्कंधाचा संघात आहे. तो प्रत्येक क्षणी निर्माण होतो आणि त्याचक्षणाला नष्टही होतो.या क्षणीचा चित्तचैत्तस्कंध (म्हणजे 'मी') नष्ट झाला म्हणजे त्याच्याशी अतिशय सदृश असा दुसरा प्रत्यय[6] निर्माण होतो. हा प्रत्यय नवा असूनही पूर्वीच्या प्रत्ययाशी सदृश असल्याने दोन्ही एकच आहेत असे वाटते.पण मुळात तो नवीनच असतो.या प्रक्रियेत घडते असे की या क्षणीचा 'मी' आपला सारा अनुभव आणि परंपरेने आपल्याकडे आलेले सारे संस्कार पुढच्या क्षणीच्या 'मी' कडे संक्रमित करुनच नष्ट होतो. पुन्हा तो 'मी' नष्ट होताना पुढच्या 'मी'कडे आधीचे व नवे संस्कार देवून नष्ट होतो, असे सतत घडते.त्यामुळे काळाच्या सातत्याचे स्मरण शक्य होते.रीले रेसमध्ये प्रत्येक खेळाडू आपल्याकडील रुमाल पुढच्या खेळाडूच्या स्वाधीन करुन निवृत्त होतो तसेच काहीसे हे घडते.

## 3)वेदान्त दर्शन

### प्रस्तावना

भारतीय तत्त्वज्ञानातील वैदिक किंवा आस्तिक दर्शनांमधील पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा ही दर्शने मूलभूत समजली गेली आहेत. *उत्तरमीमांसा* म्हणजे *वेदान्तदर्शन* होय. वेदान्त म्हणजे वेदांच्या अंतभागी येणारे किंवा शेवटी येणारे तत्त्वज्ञान होय.वेदांच्या शेवटी येणाऱ्या साहित्यास *उपनिषदे* म्हणतात.ही उपनिषदे अनेक आहे, म्हणून उपनिषदातील तत्वज्ञान म्हणजे *वेदांत* असे म्हणता येते. हा वेदांत शब्दाचा एक अर्थ झाला. दुसरा अर्थ असा की वेद जे माणसाला अंतिमतः सांगतात तो आदेश.


हा अंतिम आदेश काही वाक्यांमध्ये स्पष्ट केलेला आहे. त्यांना अंतिम महत्व असल्याने त्यांना *महावाक्ये* म्हणतात. ही महावाक्ये वेगवेगळया उपनिषंदांमध्ये विखुरलेली आहे.ही महावाक्ये म्हणजे भारतीय वैदिक तत्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. या उपनिषद वाक्यांचा समन्वय करुन काही सुत्रे रचण्यात आली. त्यांना *वेदांतसूत्रे* म्हणतात.*अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि* इत्यादी महावाक्ये आहेत.अशीच इतर काही सूत्रे अंतिम सत्य समजल्या जाणाऱ्या ब्रह्याविषयीची आहेत. म्हणून त्यांना *ब्रह्मसूत्रे* म्हणतात. ब्रह्मसूत्रांची रचना वेदव्यास, बादरायण या ऋषींनी केलेली असावी.

[5] ही कथा 'मिलिंद राजाचे प्रश्न ' या नावाने प्रसिध्द असून ती इ.स.पू. पहिल्या शतकात रचली गेली असावी.
[6] विज्ञान = जाणिवेचा प्रकार = चित्तचैत्तस्कंध = a form of consciousness

उपनिषदे,त्यातील महावाक्ये,शारीरक सूत्रे या सगळ्यांचे विचार म्हणजे वेदांताचे तत्वज्ञान, असे समजले जाते. भगवदगीता ही नंतरच्या काळात रचली गेली असली तरी ती सर्व उपनिषदांचे सार सांगते. त्यामुळे तिला सुध्दा वेदांत तत्वज्ञानाच्या ग्रंथाचा दर्जा परंपरेनुसार दिला गेला आहे.

## शंकराचार्यांचा अव्दैत वेदांत

केरळातील 'कालडी' या गावी आठव्या शतकात इ.स.788 साली आदि शंकराचार्यांचा जन्म झाला व त्यांचा मृत्यु इ.स.820 मध्ये झाला.
या अवघ्या 32 वर्षांच्या आयुष्यात शंकराचार्यांनी केवळ प्रस्थानत्रयीवरच भाष्ये लिहीली, असे नव्हे तर इतरही अनेक रचना केल्या.कवी, भक्त आणि तत्वज्ञ या तिन्हींचा संगम शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानात दिसून येतो.



7

त्यांचे *ब्रह्मसूत्रभाष्य* हे वेंदातसुत्रावरील भाष्य अतिशय प्रसिध्द असून ते *शांकरभाष्य* या नावानेही ओळखले जाते. उपदेशसाहस्त्री, शतलोकी हे ग्रंथ आणि आंनदलहरी,सौंदर्यलहरी ही स्त्रोते अत्यंत प्रसिध्द आहेत.

शंकराचार्यानी बौध्द व जैन मताचे खंडन करण्यासाठी अव्दैत वेदांताची प्रस्थापना केली. शिवाय प्रसार व प्रचारासाठी चार ठिकाणी त्यांनी वेगवेगळे मठ स्थापन केले. शंकराचार्यांचा अव्दैत वेदांताचे सार एका श्लोकात सांगता येईल.

*ब्रह्मं सत्य जगत् मिथ्या*
*जीवो ब्रह्मैव नापर:*

याचा अर्थ, *''ब्रह्म सत्य असून जग मिथ्या आहे.आणि जीव ब्रह्मच आहे. याखेरीज दुसरे काहीही नाही.''*

### *ब्रह्माचे स्वरूप : " ब्रह्म सत्य आहे"* चा अर्थ

अव्दैत वेदांताच्या मते, या जगाचा अंतिम आधार म्हणजे ब्रह्म होय. ब्रह्म हीचं अंतिम सद्‌वस्तु आहे. तिच्या खेरीज अन्य काहीही सत्य नाही.येथे सत्याचा अर्थ(नेहमीच्या दैनंदिन भाषेतील सत्य नव्हे तर ) '' जे कधीही नष्ट होत नाही आणि उत्पन्नही होत नाही; ती फक्त आहे.ती वस्तु नाही,असे आपण कधीही म्हणू शकत नाही; ती सत्य होय.'' सत्य म्हणजे जिचा कधी बाध होत नाही, तिला कधीही ' नाही' अशी बाधा होवू शकत नाही, अशी वस्तू.

ब्रह्म म्हणजे सतत जाणीव होत राहणारे भान. हे भान स्वयंसिध्द असते ते सच्चिदानंद असते.अर्थ पुढील प्रमाणे.
सच्चिदानंद = सत् + चित् + आनंद

1) 'सत्' चे स्वरुप :-

सत् म्हणजे जे आहे, जे असते ते. ज्याला खऱ्या अर्थाने अस्तित्व आहे. त्याला सत् किंवा सत्य असे म्हणले जाते. आपण जगाकडे नजर टाकली असता. आपणांस असे दिसेल की, एखादी वस्तु विशिष्ट काळी अस्तित्वात येते व कलांतराने नष्ट होते हा काळ लहान मोठा दीर्घकालीन असू शकतो. पण कधी ना कधी ती वस्तु नाही, असे घडते. आज नाही तर उद्या नाहीतर परवा नाही तर अब्जावधी वर्षानंतर का होईना वस्तु नष्ट होतात. पण ब्रह्म ही अशी सद्‌वस्तु आहे. की जी उत्पन्न होत नाही. आणि नष्टही होत नाही. जी फक्त आहे. ती कोणत्याही स्थलकालापलीकडे आहे.जिला अस्तित्व हे विशेषण लावता येईल अशी ती एकमेंव वस्तु आहे.तिलाच खऱ्या अर्थाने *सत्* म्हणता येते.

2) 'चित्' चे स्वरुप :-

चित् म्हणजे चेतना किंवा जाणीव.या सृष्टीत चेतना असणारा मुख्यतः मानव आहे. काही अंशी वनस्पतीनांही चेतना असते. उरलेला निसर्ग आणि जग निर्जीव आहे.सजीव सृष्टीमध्ये असणारा जीव किंवा चेतना जशी येते अशी ती नष्ट होते. प्रत्येक सजीव निर्जीव होतो. आज न उदया ते नष्ट होते. पण ब्रह्म ही अशी सत् वस्तु आहे की, जिच्यातील चेतना कधीही नष्ट होत नाही.

3) 'आनंद' चे स्वरुप :- :-

मनुष्यासह सर्व जिवांना सुख दुःखांची जाणीव होते. आनंद येतो नष्ट होतो. आंनद ही क्षणभंगर बाब आहे.पण ब्रह्म हे सदोदीत आनंदमय आहे. तिथे आनंद नाही, असे कधीही घडत नाही. ते त्याचे स्वरुपचं आहे.

अशारितीने ब्रह्माचे स्वरुप लक्षण म्हणजे सत् चित आंनद रुपत्व होय. हे 'ब्रह्म' चे गुणधर्म नाहीत तर ते त्याचे स्वरुप आहे.

***'जगत'चे स्वरुप : ''जग मिथ्या आहे ''* चा अर्थ :**

मिथ्या हा एक तांत्रिक शब्द आहे. त्याचा अर्थ वेंदातांच्या परिभाषेतच समाजावून घ्यायला पाहिजे.मिथ्या म्हणजे भासात्मक जग.नसताना आहे असे वाटणे म्हणजे भास होया. साधारणपणे आपण खरे, खोटे, सत्य असत्य असे शब्द वापरतो, शंकराचार्य '*मिथ्या' हा* शब्द वापरतात. एखादी वस्तु सत्य असते. म्हणजे ती अस्तिवात असते आणि नसते म्हणजे अस्तित्वात नसते. जगाचे अस्तित्व अशा तऱ्हेचे सत्य किंवा असत्य नाही तर ते मिथ्या आहे.

मिथ्यात्व म्हणजे नसतांना आहे, असे भासणे, जग मुळात अस्तित्वातच नाही ते जन्मलेलेंच नाही. पण तरीही ते आहे. असे आपल्याला वाटते. कारण आपणाला ते खरे वाटते. ज्याक्षणी त्याचे मिथ्यात्व लक्षात येईल, त्या क्षणाला आपणाला ब्रह्म सत्यत्वाची जाणीव होईल.

## अध्यास आणि मायावाद

ब्रह्म सत्य आहे आणि जगत् मिथ्या आहे,हे सिध्द करण्यासाठी एक शंकराचार्यानी मायावाद मांडला.ब्रह्म सत्य आहे आणि जग मिथ्या आहे, असे केवळ म्हणून भागत नाही, तर ते सिध्दही करावे लागते.समोर जग दिसते आहे,जगाचा अनुभव येतो आहे, एवढेच नव्हे तर मी स्वतःच जगाचा भाग आहे, माझे खाणेपिणे,नोकरी शिक्षण इत्यादी जीवन चालू असताना जग अस्तित्वात नाही, असे कसे म्हणता येईल ? याचे स्पष्टीकरण म्हणून मायावादातून मिळते.

शंकराचार्याच्या मते जग हा ब्रह्मावर केलेला ***अध्यास*** आहे. प्रथम पाहिलेल्या वस्तुचे दुस-या वस्तूच्या ठिकाणी होणारे स्मरणाच्या स्वरुपाचे ज्ञान म्हणजेच अध्यास होय. (स्मृतिरुपःपरत्र पूर्वदृष्टावभास : । ब्र. सू. शां. भा.1. 1.1)

दृश्य जग हा भास आहे, भ्रम आहे.जसे आपण अंधारात चालत असताना अचानक साप दिसतो, आपण घाबरतो, मागे येतो आणि मग नंतरच्या क्षणी कळते की ती दोरी आहे,साप नाही ! साप नसताना दिसतो आणि दोरी असताना दिसत नाही. अगदी तसे जग अस्तित्वात नाही पण ते दिसते आणि ब्रह्म आहे पण जाणवत नाही . म्हणजे जे आहे त्याचे ज्ञान होत नाही आणि जे मूळात नाहीच त्याचा मात्र भास होतो !! हे चमत्कारीक आहे . पण ज्याक्षणी आपणास ब्रह्माचे ज्ञान होते त्याक्षणी जगाचा भासही विलय पावतो.मग फक्त ब्रह्मज्ञानच उरते.या सिध्दान्ताला *विवर्तवाद* म्हणतात. विवर्त म्हणजे एका वस्तुच्या अस्तित्वाचा दुसऱ्या वस्तुवर आरोप करणे.

याची तीन उदाहरणे दिली जातात. दोरी - साप, शिंपला - चांदी, पाणी - वाळवंट. उदा.दोरीवर सापाचा आरोप करणे.यालाच *अध्यास* असेही नाव आहे.आधी कुठेतरी आपण साप पाहिलेला असतो. तोच नेमका दोरीच्या जागी दिसतो, खरे तर त्याचे स्मरण होते. म्हणून आधी पाहिलेल्या वस्तुचे दुसऱ्या वस्तुच्या ठिकाणी होणारे स्मरण म्हणजे *अध्यास* असे म्हंटले आहे.तेच समुद्र किनारी चांदी भासते, किंवा वाळवंटात पाण्याचा भास होतो, तेंव्हा हेच घडते.

पण असा भास का होतो ? थेट दोरीचे ज्ञान का होत नाही? म्हणजेच जगाचा भास का होतो ? थेट ब्रह्मज्ञानच का होत नाही ? यावर शंकराचार्यांचे उत्तर असे की जीवाच्या ठिकाणी असणारे अज्ञान,अविद्या यामुळे थेट ब्रह्मज्ञान होवू शकत नाही. कशाचे अज्ञान ? तर '' मी ब्रह्म आहे '' हे ज्ञान न होणे हे अज्ञान. या अविद्येलाच *माया* म्हणतात.

अविद्येमुळे ब्रह्म या सद्वस्तूवर आपण जगाचा अध्यास करीत असतो. जग हे अध्यस्त झाले तरी जगाचे मालिन्य, जगाची जडता, जगातील घडामोडी यांनी ब्रह्म दूषित होत नाही. रज्जूवर सर्पाचा आरोप केला म्हणजे काही त्या रज्जूत फरक पडत नाही. ती आहे तशीच राहते. असे असले तरी सर्पाचा भासही खरा असतोच.

## सत्तेचे / वास्तवाचे स्वरुप

### अ) पाश्चात्य सिध्दान्त : चिद्वाद आणि जडवाद

### चिद्वाद


दृश्य जगाचे मूळकारण किंवा ज्यामधून जग आणि सर्व सजीव सृष्टि निर्माण झाली ते 'मूळ' (जड - material नसून) केवल चैतन्य (Idea) आहे, असे सांगणारा तत्त्वज्ञानातील सिद्धान्त म्हणजे चेतनावाद/ चैतन्यवाद / चिद्वाद **(Idealism)** किंवा अध्यात्मवाद होय. 'चित्' म्हणजे चेतना (Consciousness/ Awareness/ Spirit) पासून हे सर्व शब्द बनतात. चित् + वाद = चिद्वाद. चेतन वस्तुवाद किंवा चित् सत्तावाद असेही मराठीत म्हंटले जाते.

या वादानुसार सर्व जगताची आणि जीवमात्रांची सत्ता किंवा अस्तित्व यांचे मूळ 'एक विशिष्ट चैतन्यवस्तू' आहे; अन्य काहीही नाही. तेच विश्वाचे मूळकारण असून त्यास 'आद्यतत्त्व' म्हंटले आहे. जगत आणि जीव यांची निर्मिती त्यापासूनच होते.तेच माणसाचे मूळस्वरुप आहे. चिद्वादी तत्त्ववेत्त्यांच्या मते, आपण जाणतो ती वास्तवता ही मूलतः मनोनिर्मित,

मानसिक रचना किंवा अभौतिक स्वरुपाची आहे. चैतन्य हे विश्वाचे अधिष्ठान असून तेच मूलभूत अस्तित्व आहे आणि भौतिक सृष्टी, निसर्ग हे त्यावर आधारित असलेले, म्हणून दुय्यम अस्तित्व आहे, असे चिद्वादाचे मत आहे.

पाश्चात्य तत्त्वज्ञानात **Idealism** प्रथम प्लेटो या तत्त्ववेत्त्याने मांडला. तथापि Idealism हा शब्द प्रथम लायब्नीझ (1646-1716) या जर्मन तत्त्ववेत्त्याने प्रचारात आणला. Idea हा शब्द Id किंवा *idein* (meaning "to see") या ग्रीक शब्दापासून बनतो. Id म्हणजे पाहाणे आणि Idea म्हणजे सखोल निरीक्षण करणे, जाणून घेणे. या शब्दाचा मूळ अर्थ 'वस्तूचे आपल्या दृष्टीला गवसणारे रूप, आकृती असा' आहे. विविध प्रकारच्या कल्पनांना उद्देशून Idea हा शब्द वापरला जातो

## प्लेटोचा चिद्वाद :


प्लेटो **Plato** (इ.स.पू. 427 ते 347)

पाश्चात्य तत्त्वज्ञानात **Idealism** प्रथम प्लेटो या तत्त्ववेत्त्याने मांडला. त्यानंतर सुमारे दोन हजार वर्षांनी लायब्नीझने त्याचे नामकरण केले.

प्लेटोच्या मते ज्याचे आपणास ज्ञान होते ती वस्तू नसते तर त्या वस्तूची 'कल्पना' असते.तिला तो **'आयडिया' (Idea)** म्हणतो.ही कल्पना त्या वस्तूचे सारतत्त्व (essence) असते.वेगळ्या भाषेत वस्तूंमध्ये असणारा समान गुणधर्म म्हणजे आयडिया होय.नाणे,बांगडी,भाकरी,चपाती इत्यादी गोल वस्तूंमध्ये गोलपणा किंवा वर्तुळ नावाचा समान गुणधर्म असतो. अनेक घोड्यांमध्ये अश्वत्व, माणसातील मनुष्यत्व ही आयडिया असते. संगणकांमध्ये संगणकत्व ही आयडिया असते. त्रिकोण, चौकोन, चौरस, एक, दोन,तीन,झाड,नदी इ.इ.मध्ये त्या त्या वस्तूंच्या आयडिया असतात.जी जी वस्तू अथवा व्यक्ति असते तिची समान अशी आयडिया असते.

आता या आयडियाचे स्वरूप कसे आहे किंवा असते ? तर प्लेटोच्या मते ही आयडिया चैतन्यमय असते.ती शाश्वत, अमर, स्थिर, कायम,नित्य असते.ती कधीही बदलत नाही, अपरिवर्तनीय असते. सौंदर्य, नीती, मूल्य, प्रेम, करुणा, भावना, मैत्री, संख्या, ईश्वर, धर्म, गुणधर्म,संबंध,क्रिया या साऱ्या आयडिया आहेत.

आयडिया स्थिर, अपरिवर्तनशील,अविकारी,परिपूर्ण व अविनाशी असतात.त्यांचा कधी नाश होत नाही.त्या कधी जन्माला येत नाहीत त्या कधी मरत नाहीत.त्या केवळ *असतात*.जगातील प्रत्येक वस्तू, पदार्थ, घटना, व्यक्ति, काल यांच्या आयडिया असतात.

आता, कोठे असतात अशा आयडिया ? आयडिया मानवी बुध्दित असतात की जगात इतर अनेक वस्तूंसारख्याच एक वस्तू म्हणून अस्तित्वात असतात ? प्लेटोच्या मते जग नाशवंत असल्याने त्या जगात अस्तित्वात असूच शकत नाहीत, एकतर त्या अमूर्त असतात आणि दुसरे म्हणजे त्या भौतिक वस्तू नसतात.

मग आयडिया असतात तरी कुठे ? प्लेटोच्या मते आयडियांचेच स्वतःचे स्वतंत्र जग असते ! त्या जणू काही स्वर्गात वसत असतात. **आयडियांचे स्वतंत्र जग** असते. (The World of Ideas). प्रत्येक वस्तूच्या, नैतिक तत्त्वांच्या आयडिया या जगात असतात.

अशा आयडियांनाच स्वतंत्र परिपूर्ण अस्तित्व,नित्य,शाश्वत अस्तित्व असते.या आयडियांचे ज्ञान हे अचूक,सत्य व नित्य असते.ते उच्च पातळीवरील असते.खरे अस्तित्व त्यांनाचा असते. मग त्यांचे ज्ञान कसे होते ? कोणत्या ज्ञानेंद्रियास होते? तर ,

प्लेटोच्या मते आयडियांचे ज्ञान ज्ञानेंद्रियास होत नाही.त्या केवळ बुध्दिलाच कळू शकतात. आयडिया चैतन्यमय असतात. जसे त्यांचे स्वरूप असते तसे त्यांच्या ज्ञानाचे साधन असते. या बुध्दिलाचा विवेकशक्ति म्हणतात. आयडियांनाच खऱ्या ज्ञानवस्तूचा दर्जा मिळू शकतो, म्हणून बुध्दि हेच खऱ्या ज्ञानवस्तूचे खरे ज्ञानाचे साधन असते.

अशा आयडियांची श्रेणिबध्द रचना असते. त्यात एक आयडिया सर्वोच्च असते. ही खुद्द आयडियांचीच आयडिया असते.ही आयडिया म्हणजे 'शिव' (The Good) ची होय. शिव म्हणजे ईश्वर (God) असेही प्लेटो म्हणतो.ईश्वर ही

आयडियांची आयडिया आहे.ती सर्वोच्च आयडिया आहे.बुध्दिमार्फत मिळणारे आयडियांचे ज्ञानच सत्य व नित्य तसेच समर्थनीय असते,असे प्लेटो म्हणतो.

**2) बर्कलेचा व्यक्तिनिष्ठ कल्पनावाद :**

बुध्दि (किंवा मन ) हेच ज्ञानाचे साधन आहे, असे सांगणारा प्लेटोनंतरचा पाश्चात्य तत्त्वज्ञानातील दुसरा महत्वाचा विचारवंत म्हणजे जॉर्ज बर्कले (१२ मार्च १६८५-१४ जानेवारी १७५३) हा आयरिश तत्त्वज्ञ होय.बर्कले चर्चचा बिशप (म्हणजे धर्मगुरु) होता.तो तत्त्वचिंतक तर होताच पण तळमळीचा कार्यकर्ता होता. जनतेचे कल्याण आध्यात्मिक आणि भौतिक दृष्टिकोनातून केले पाहिजे, ही त्याची भूमिका होती.त्यामुळे शुध्द जटील तत्त्वचिंतनाबरोबरच त्याने मोठे शिक्षणविषयक कार्यही केले.



George Berkeley
(12 March 1685 – 14 January 1753 )
Anglo-Irish philosopher.
Famous for
"to be is to be perceived".



बर्कलेने बुध्दिला ज्ञानाचे साधन मानले खरे, पण तो मुळात अनुभववादी तत्त्वज्ञ आहे.बर्कलेचा अनुभववाद 'व्यक्तिनिष्ठ चिद्‌वाद ' (Subjectiv Idealism) या नावाने ओळखला जातो.तत्त्वज्ञानाच्या इतिहासात बर्कलेची कामगिरी इतकी मूलगामी आणि महत्वाची आहे की त्यास ' आधुनिक चिद्‌वादाचा जनक ' ही पदवी देणे योग्य आहे, असे मत प्रसिध्द तत्त्वज्ञानाचा समीक्षक शॉपेनहॉवर (१७८८-१८६०) यांनी व्यक्त केले आहे.

बार्क्लेचे म्हणणे असे की आपल्याला ज्ञान होते याचा अर्थ वस्तूच्या केवळ संवेदना आपल्याला जाणवतात, मनात संवेदनाच असतात; प्रत्यक्षात वस्तू अस्तित्वात नसतेच. ज्ञान म्हणजे संवेदना आणि त्यांच्या प्रतिमा, 'अस्तित्व म्हणजे प्रत्यय' (to be is to be perceived) हा त्याचा सिद्धांत आहे. भौतिक वस्तूंचे साक्षात दर्शन आपल्याला कधी होतच नाही. आपल्याला ज्यांचे साक्षात दर्शन होते. आपल्या जाणिवेचे जे साक्षात विषय असतात ती म्हणजे आपली संवेदने. उदाहरणार्थ, 'मी जेव्हा टेबल पाहतो तेव्हा माझ्या मनात टेबलाची संवेदने पाहतो, प्रत्यक्ष टेबल नावाची वस्तू अस्तित्वात नसते. फक्त माझ्या मनात टेबलाची संवेदने असतात, त्यामुळे 'टेबल आहे' असे आपणास वाटते, एवढेच. हेच आपल्या भावना, इत्यादी बाबत खरे आहे. आपण आणि आपल्या मनात असलेल्या वस्तूच्या संवेदना, प्रतिमा, कल्पना तसेच सुखदुःख, इच्छा इत्यादि भावना याच खऱ्या असतात. त्या त्या व्यक्तीवर अवलंबून असतात. व्यक्ती अनुभव घेईल तेंव्हाच त्या असतात, अनुभव घेत नसेल तर त्या नसतात. हा बार्क्लेचे 'व्यक्तीनिष्ठ कल्पनावाद' होय. म्हणजे आपल्या जाणिवेचे साक्षात विषय असलेल्या गोष्टीच तेवढ्या अस्तित्वात आहेत, एवढेच आपल्याला म्हणता येते, असे तो म्हणतो.

पण मग, आपल्या मनातील वेदने (आणि त्यांनी मागे ठेवलेल्या प्रतिमा) याच जर आपल्या जाणिवेचे साक्षात विषय असतील तर त्यांच्यापेक्षा वेगळे मनाबाहेर जग आणि भौतिक वस्तू आहेत की नाही ? त्यांचे ज्ञान कसे होते? अनुमानाने होत असेल तर ते अनुमान आपण कसे करू शकू? जसे की 'मी जेव्हा टेबल पाहतो तेव्हा माझ्या मनात टेबलाची संवेदने पाहतो' एवढेच जर असेल, तर मी पाहतो ते टेबल म्हणजे काही संवेदने आहेत व हे टेबल माझ्या मनात आहे असे होईल. पण जे टेबल मी पाहतो ते इतरही पाहू शकतात. तेव्हा मी पाहतो ते टेबल माझ्या मनात आहे, असे कसे म्हणता येईल? ह्यावर बर्क्लीचे उत्तर असे, की जेव्हा 'अ' आणि 'ब' ह्या व्यक्ती एकाच परिसरात असतात आणि तेच टेबल पाहतात तेव्हा 'अ' आपल्या मनातील वेदनांचा पुंज पाहत असतो आणि 'ब' या वेदनांसारखीच पण त्याच्या मनात असलेली वेदने पाहत असतो. ईश्वर 'अ' आणि 'ब' यांच्या आणि तेथे असलेल्या इतर कुणाही व्यक्तीच्या मनात सारखीच वेदने निर्माण करीत असतो. अशा परिस्थितीत अनेक व्यक्ती एकच वस्तू पाहत आहेत, असे बार्कली म्हणतो. मनांत असलेल्या वेदनापलीकडची अशी भौतिक वस्तू तेथे नसते.

पण समजा, खोलीत टेबल आहे आणि कुणीही ते पाहत नाही, तर ते आहे की नाही ? यावर बार्कली म्हणतो की कुणीही पाहात नसले तरी ते टेबल तेथे असतेच ! कसे काय ? तर 'ते टेबल ईश्वर पाहात असतो, ते टेबल ईश्वराच्या मनातील संवेदने, या स्वरूपात असते. थोडक्यात, बार्क्लीच्या मते काय अस्तित्वात असते ? तर,-

1. संवेदनांचा निर्माता व मूळ ज्ञाता असा ईश्वर.

2. ईश्वराने निर्माण केलेली माणसे, प्राणी
3. त्यांच्या मनात ईश्वराने निर्माण केलेल्या संवेदना
4. आणि त्यांच्या जाणिवेचे साक्षात विषय असलेल्या प्रतिमा, इच्छा इत्यादि.

बार्कली मते, भौतिक वस्तू किंवा जडवस्तू असे विश्वात काही नसते. आपण झाडे, दगड, चांदण्या इ. वस्तू पाहतो, त्या वस्तू जगात आहेत, हे बर्क्ली नाकारीत नाही. पण ज्या वस्तू आपण पाहतो, ज्या आपल्या अनुभवाचे विषय असतात "*त्या भौतिक वस्तू असतात*" हे तो नाकारतो. त्याच्या मते या वस्तू म्हणजे आपल्या, इतर माणसांच्या आणि ईश्वराच्या मनातील संवेदना आहेत आणि आपल्याला, इतरांना व ईश्वराला साक्षात जाणीव असते, असे तो मानतो. जोपर्यंत संवेदन व्यक्तीच्या मनात असते व त्याची जोपर्यंत व्यक्तीला जाणीव असते, तोपर्यंतच त्याचे अस्तित्व टिकून असते हे उघड आहे. विश्वात जे जे काही आहे त्याचे अस्तित्व, त्याचे कुणाला तरी ज्ञान होण्यावर अवलंबून असते, असे बर्क्लीचे मत आहे. बर्क्लीने आपल्या या मताला 'अजडवाद' असे नाव दिले आहे.

बर्कलेच्या व्यक्तिनिष्ठ चिद्‌वादानुसार मानवी संवेदनांनाच खरे महत्व आहे. बाह्यविश्वाचा अनुभव आणि अनुभव घेणारा ज्ञाता माणूस यांचे मन या दोन घटकांच्यात कोणता संबंध असतो, हा महत्वाचा मुद्द आहे. त्याच्या मते वास्तव किंवा वास्तविकता (reality) ही खरी ज्ञाता व्यक्तिच्या मनातच असते, एवढेच नाही तर खरी वास्तविकता केवळ मनालाचा असते, तेच अस्तित्वात असते, असे हा चिद्‌वाद सांगतो.

2) **जडवाद :**

या उलट सर्व ब्रह्मांड आणि सर्व जीवांची उत्पत्ती एका जडतत्त्वातून झाली असून विलयसुद्‌धा त्यातच होणार आहे. सारे ब्रह्मांड आणि माणसाचा इतिहास, धर्म, संस्कृती, साहित्य, कला, संगीत इत्यादी आविष्कार हे जडाचीच रुपे आहेत, असे मानणारा विचारप्रवाह म्हणजे **जडवाद** होय. 'अंतिम सत्य' या नावाने जे काही मानले जाते ते केवल जडद्रव्य' (matter) आहे. ''ती वस्तू आहे, पण चेतन नसून जड आहे'', असे हा विचार सांगतो.

दृश्य जगत आणि त्याचा घटक असणारी प्रत्येक वस्तूचे मूळ स्वरूप हे जडद्रव्य किंवा ऊर्जा (**matter** or **energy**) आहे.सर्व वस्तू जडाच्याच बनतात आणि जाणीव - सजीवता (**consciousness**) ही सुद्‌धा भौतिक आंतरक्रियांमुळे निर्माण होतात. जडवादानुसार सर्व ब्रह्मांड आणि सर्व जीवांची रचना काही एक विशिष्ट रचनेने झाली आहे. ही रचना विशिष्ट ऊर्जेने रचली गेली आहे. उदाहरणार्थ, अग्नी ही एक रचना आहे आणि ती वायुमय स्वरुपाची आहे. तारे, तारका, ग्रहांमध्ये ती प्रकाशरुपात असते तर निर्जीव वस्तूंमध्ये 'स्थिरता' या रुपात असते. सजीवांमध्ये ती चेतनमय असते ,सवयंचलन या रुपात, तर माणसात ती, अहंकार किंवा आत्मजाणिव अथवा आत्मभान या स्वरुपात असते. ही ऊर्जाच सर्व विश्व, सजीवनिर्जीवांना आकार देते, म्हणजेच जडत्व देते.

पण,ऊर्जा चेतनमय आहे, ती जडात कशी येईल ? तर याच उत्तर असे की ऊर्जा एखाद्या रत्नप्रभेसारखी असते. रत्न जड असूनही प्रभा, चमक निर्माण करते, तसे ऊर्जा जडवस्तूत निर्माण होते. सूर्य जड वायुगोळा असूनही अग्नी फेकतो, ग्रहमंडळ निर्माण करतो, त्यातील जड पृथ्वीवरच सर्व सजीवांची, नवस्पतीची रचना होते, निर्मिती होते.

जडवादी विचारसरणीनुसार ईश्वर, धर्म, धर्मसंस्था, कर्मकांडे, सणवार, श्रध्दा यांना काहीही महत्व नाही, त्यासाऱ्या अंधश्रद्‌धा आहेत. ब्रह्म, ईश्वर इत्यादी चेतनतत्त्व मानल्यामुळेच या अंधश्रद्‌धा निर्माण होतात, त्यातून शोषण निर्माण होते. उलट जडवस्तू मानली तर तिचे नियम शोधता येतात, त्यातून विज्ञान निर्माण करता येते. वैज्ञानिक नियमानुसार जगाची निर्मिती होते, जीवांची-माणसांची उत्क्रांती होते. विश्वाचेच नियम समाजाला लागू करता येतात, विश्वाप्रमाणे समाजालाही जन्म-मृत्यू असतात, जडातच साऱ्याचा विलयही होतो. जडवादालाच भौतिकतावाद असेही म्हंटले आहे.

जडवादाचा एक प्रकार म्हणजे अणुवाद. ही प्राचीन विचारसरणी आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्रथम अणुवाद प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता डेमोक्रिटसने मांडला. त्याने विश्वाविषयी अणुवादाच्या स्वरूपात भौतिकतावाद मांडला. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

**डेमॉक्रिटसचा भौतिकतावाद**



डेमॉक्रिटसच्या मते, या विश्वाची,माणसाची आणि आत्म्याची रचना अणुंनी झाली असून ते अणु अतिशय सूक्ष्म असतात. प्रत्येक पदार्थ, वस्तू , पशुपक्षी यांचे विभाजन केल्यास शेवटी विभाजन करता येणार नाही, असा पदार्थ मिळतो तोच अणु होय.

डेमॉक्रिटस (इ.स.पू.460 ते 370)

विविध प्रकारे त्यांचे संमिश्रण होवून हवा, पाणी, वायू, सजीवांची निर्मिती होते.विश्वाची अंतिम सत्ता असलेले जडद्रव्य अणूंचे बनलेले आहे.अणु असंख्य,छोटेमोठे, अदृश्य, अविनाशी,नित्य,अपरिवर्तनीय आणि अवकाशव्यापी आहेत.

विश्वाची रचना लहानमोठ्या अणुंनी झाली आहे. हे विश्व म्हणजे अनंत अशी पोकळी आहे.विश्वातील या पोकळीत असलेले अणु गतिमान असतात.सर्वात गतिमान अणु विचारवाहक असतात तर ज्ञानाचे अणु सर्वात छोटे गोल,गुळगुळीत असतात.मानवी शरीर व मन यावर अणुंचा आघात होतो.त्यामुळे स्पर्श, रंग इत्यादी संवेदना होतात.

विश्वाच्या निर्मितीमागे कसलाही हेतू नाही, योजना नाही. ते अपघाताने निर्माण झाले आहे. ते अणुंनी बनलेल्या यांत्रिक नियमांनी चालते.या नियमांची रचना गणितीपध्दतीची आहे.ते चालविणारा कोणी ईश्वर, अंतिम तत्त्व इत्यादी काही नाही.

थोडक्यात, विश्व निर्मिती पोकळी, अणु व गति या तीन तत्त्वांनी होते.आपणास दिसणारे हे विश्व एकच नसून पोकळीत अनेक विश्वे आहेत. आपले विश्व त्यापैकी एक आहे.आत्म्याचे अणु सर्व शरीरभर पसरलेले असतात.सुख मिळवणे हे आत्म्याचे ध्येय असल्याने माणसाने नेहमी आनंदी, हसरे असावे; असे डेमॉक्रिटसचे मत होते.म्हणूनच डेमॉक्रिटसला 'हसरा तत्त्वज्ञानी ' (**The Laughing Philosopher)** म्हणतात.

***************